## शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय , कळंबोली
## 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' – अहवाल
## (९ ऑगस्ट २०२२ – १७ ऑगस्ट २०२२)

शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय कळंबोली येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत ' हर घर तिरंगा' उपक्रम दि. ९ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट २०२२ या कालावधीत राबविण्यात आला.

दि. ९ ऑगस्ट रोजी आमच्या महाविद्यालयाच्या प्रांगणात सामुदायिक राष्ट्रगीत गायन घेण्यात आले. तसेच समाज प्रबोधनपर पोस्टर स्पर्धा घेण्यात आली.

दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी ९:३० वाजता मा. विजय कोकणे (संचालक – जनशिक्षण संस्था रायगड) यांना आमंत्रित करण्यात आले. या कार्यक्रमात समाजसेवा , आरोग्य, परिसर स्वच्छता या संदर्भात मार्गदर्शन करून विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅडचे वाटप केले. तसेच त्यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

दि. ११ ऑगस्ट रोजी सकाळी १०:३० वाजता 'स्वातंत्र्य चळवळीत रायगड जिल्ह्याचा सहभाग ' या विषयावर इतिहास विभागप्रमुख डॉ. बाबन जाधव यांनी पी. पी. टी. द्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम इतिहास विभाग व मराठी विभाग यांच्यामार्फत घेण्यात आला.

दि. १२ ऑगस्ट रोजी कळंबोली गाव व कॉलनी येथे रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी विद्यार्थी व नागरिक सहभागी झाले त्याचबरोबर कॉलनीमधील नागरिकांना झेंड्याचे वाटप करण्यात आले तसेच सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे रंगोली स्पर्धा घेण्यात आली. तसेच ग्रंथालय विभागामार्फत डॉ. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त स्पर्धा परीक्षा व चरित्रग्रंथ यांचे प्रदर्शन लावण्यात आले.

दि. १३ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त वादविवाद स्पर्धा , वेशभूषा स्पर्धा, निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपला उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. तसेच सेल्फी पॉईंट चे उद्घाटन करण्यात आले. हे कार्यक्रम सांस्कृतिक विभाग, मराठी विभाग, एन.एस. एस. विभाग वाणिज्य विभाग व महिला विकास कक्ष यांच्यामार्फत घेण्यात आला.

दि. १४ ऑगस्ट रोजी ग्रंथालय विभागामार्फत माहिती साक्षरता आणि ऊद्बोधन कार्यक्रम घेण्यात आला.

दि. १५ ऑगस्ट रोजी सांस्कृतिक विभाग व एन. एस. एस. विभाग यांच्यामार्फत ध्वजवंदन व वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या.

दि. १६ ऑगस्ट रोजी सांस्कृतिक विभागातर्फे देशभक्तीपर गीतगायन स्पर्धा व महिला विकास कक्षातर्फे स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचे योगदान या विषयावर विद्यार्थ्यांना लघुपट दाखविण्यात आला.

दि. १७ ऑगस्ट रोजी स्वराज्य महोत्सव सांगता समारंभ व पारितोषिक वितरण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी ह. भ. प. महेश साळुंखे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रभावी भाषेत मार्गदर्शन केले व बक्षीस वितरण केले. या कार्यक्रमास प्राचार्य डॉ. मनीषा बनसोडे , सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

SHIKSHAN MAHARSHI DADASAHEB LIMAYE COLLEGE * KALAMBOLI
ESTABLISHED 1998

प्राचार्य
PRINCIPAL
S.E.S.'s S. M.Dadasaheb Limaye
College, Kalamboli,
Tal : Panvel, Dist : Raigad.